# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्र. ५९-२२** **दिनांक २३/०२/२०२२**

## शॉर्ट-टाईम ऑनलाईन लोन (कर्ज) घेण्यापासुन सावधान- सायबर गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांचे नागरीकांना आवाहन

सध्या विविध ऑनलाईन ॲपव्दारे नागरिकांना Short Time Online Loan ( कमी कालावधीचे ऑनलाईन कर्ज ) घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात येत असून वेगवेगळया प्रकारचे ऑफर देवुन कमी व्याजदर ठेवुन कमी वेळेत लोन (कर्ज) मंजुर करुन देतो अश्या प्रकारचे विविध आमिष दाखवून सामान्य जनतेस ऑनलाईन लोन (कर्ज ) घेण्यास भाग पाडले जात आहे. नागरिकांना सदर लोन घेण्याकरीता त्यांचे कंपनीचा ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड करण्यास सांगुन त्यांचे मोबाईल मधील महत्वपुर्ण माहिती ( Gallery, Phone List, Photo-Video, Etc.) संबंधीत कंपनीस शेअर करण्याचे बंधन ठेवुन नागरीकांना लोन मंजुर केले जाते. त्यानंतर सदरील व्यक्तीने संबंधीत कंपनींचे लोन (कर्ज) फेडल्यानंतर देखिल त्यांना अधिकची रक्कम भरण्याची सक्ती केली जाते व ग्राहकाने त्यास विरोध केल्यास सदर लोन मंजुर करतेवेळी ग्राहकाने सादर केलेल्या त्याचे फोनमधील Gallery, Phone List, Photo-Video, Etc ( गॅलरी, फोन लिस्ट, फोटो-व्हिडीओ) माहितीव्दारे सदर नागरीकांस व त्याचे नातेवाईक- मित्रमंडळी यांना शिवीगाळ, अश्लिल फोटो/व्हिडीओ पाठवुन अधिकचे पैसे भरण्याची धमकी दिली जात असल्याबाबतच्या बाबी लक्षात आलेले आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे सायबर गुन्हे शाखेकडुन नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणत्याही अनधिकृत ॲपव्दारे लोन ( कर्ज ) घेवु नका व Short Time Online Loan ( कमी कालावधीचे ऑनलाईन कर्ज ) अश्या स्वरुपाचे आमिषाला बळी पडण्यापासुन सावधान रहा! त्याचप्रमाणे कुणासोबत असा प्रकार घडल्यास नजीकचे पोलीस ठाणे किंवा सायबर गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांशी संपर्क साधावा.




